**<u>ठळक बातम्या</u>**

- रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढाव्यात रेपो दरात अर्धा टक्के कपात
- जगातल्या सर्वात उंच कमानीवरच्या पुलाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन/ जम्मू काश्मीरमधे ४६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं केलं लोकार्पण
- नीट परीक्षा येत्या ३ ऑगस्टला एकाच सत्रात घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची परवानगी
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम

**आणि**

- बेंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या विपणन विभागाचा प्रमुख निखिल सोसाळे याच्यासह आणखी दोघांना अटक

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज द्वैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. पतधोरण समितीनं रेपो दरात अर्धा टक्के कपात केली आहे. आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. फेब्रुवारीपासून सलग तिसऱ्यांदा रिझर्व्ह बँकेनं व्याजदरात कपात केली असून या कालावधीत रेपो दर एकूण १ टक्क्यानं कमी झाला आहे.

चालू आर्थिक वर्षात चलनफुगवट्याचा दर ३ पूर्णांक ७ दशांश टक्के पर्यंत आटोक्यात राहील असा सुधारित अंदाज पत धोरण समितीनं आढाव्यात व्यक्त केला आहे. या आधी हा दर ४ टक्के राहील असा अंदाज होता. चालू आर्थिक वर्षासाठी देशाचा आर्थिक वृद्धी दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये सुरू होणारा उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्प हा भारताच्या नव्या सामर्थ्याचा जयघोष आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज जम्मू आणि कश्मीरमध्ये ४६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते. यावेळी त्यांनी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पाचं राष्ट्रार्पण केलं. तसंच या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आणि जगातला सर्वात उंच कमानीवरचा रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. तसंच, देशातला सर्वात उंचावरचा केबलवरचा पूल असलेल्या अंजी पुलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. हा रेल्वे प्रकल्प पूर्ण करणं अत्यंत आव्हानात्मक होतं. पण आपल्या सरकारने हे आव्हान पूर्ण केलं. या मार्गावरचे दोन्ही पूल जम्मू काश्मीरच्या समृद्धीचा मार्ग बनतील. पर्यटनासह अर्थव्यवस्थेच्या इतर घटकांनाही याचा लाभ होईल, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. यावेळी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला उपस्थित होते.

या कार्यक्रमात त्यांनी रेल्वे प्रकल्पात आणि चिनाब पूल निर्मितीत सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. तत्पूर्वी, प्रधानमंत्र्यांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर त्यांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबर गाडीने प्रवास केला.

**<><><><><>**

देशातल्या युवकांनी जागतिक स्तरावर आपला ठसा निर्माण केला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एनडीए सरकारनं ११ वर्षात युवकांसाठी विविध क्षेत्रांमध्ये स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यांसारख्या अनेक योजना राबवल्या असल्याचं

प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. रालोआ सरकारनं  गेल्या ११ वर्षात विविध उपाययोजनांमार्फत तरुण पिढीला सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे.

**<><><><>**

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी नागरिकांना बकरी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. ईद  अल - अधा हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं राष्ट्रीय परीक्षा मंडळाला ३ ऑगस्ट रोजी एकाच सत्रात नीट प्रवेश परीक्षा घेण्याची परवानगी दिली आहे. याआधी ही परीक्षा १५ जूनला होणार होती. मंडळानं ३ जून रोजी परीक्षा केंद्रांची संख्या दुप्पट करणं आणि सुरक्षा व्यवस्थेसाठी वेळ वाढवण्याची मागणी करणारा अर्ज दाखल केला होता. न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं सुरुवातीला परीक्षा घेण्यासाठी मंडळानं मागितलेल्या दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. मात्र नंतर ३ ऑगस्ट रोजी नीट परीक्षा घेण्यामागची कारणं योग्य असल्याचा निर्वाळा  न्यायालयानं दिला. नीट परीक्षा घेण्यासाठी राष्ट्रीय परीक्षा मंडळाला आणखी वेळ दिला जाणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकदिनानिमित्त आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. हिंदवी स्वराज्याची राजधानी रायगड इथं रायगडावर विशेष कार्यक्रम होत असून पुण्यात अखिल भारतीय शिव महोत्सव समिती, मराठा सेवा संघ आणि इतर शिवप्रेमी संघटनांच्या वतीनं लाल महाल इथं शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्त राज्यातल्या विविध गड किल्ल्यांवर विविध कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

विकसित भारत घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात सुधारणा आणि विकासाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने देशभरात कृषी संकल्प अभियान सुरू केलं आहे. नंदुरबार जिल्ह्यात अडगाव या संपूर्ण आदिवासी गावात आज या अभियाना अंतर्गत शेतकरी मेळावा घेण्यात आला.  कृषी विभाग, पशु संवर्धन विभाग, आत्मा, कृषी विज्ञान केंद्र यांच्यातर्फे शेतकऱ्यांना जैविक शेती, फळ, भाजीपाला शेती, कृषिपूरक उद्योगात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बाबत सविस्तर माहिती देण्यात आली. कृषि संकल्प अभियान नंदुरबार जिल्ह्यातील प्रत्येक गावात राबवण्यात येत असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष होतांना दिसत आहे. ऐकूया शेतकरी विलास ठाकरे यांची प्रतिक्रीया….

**होल्ड - बाईट-**

**<><><><><>**

महावितरणच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त ‘शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र’ या संकल्पनेद्वारे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात विविध ठिकाणी महावितरण तर्फे काल विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरीत नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री अतुल सावे यांच्यासह अभियंते, अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते. राज्यात १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे.

महावितरण प्रशासनानं आयोजित केलेल्या विद्युत सुरक्षा सप्ताहा दरम्यान आज अकोला जिल्ह्यात चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा तसंच पथनाट्याच्या माध्यमातून वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

**<><><><><>**

माजी मंत्री आणि काँग्रेसचे माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे आणि त्यांचे बंधु शंकर म्हेत्रे यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट इथं काल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या सोहळ्यात हा पक्ष प्रवेश झाला. यावेळी मंत्री दादा भुसे, मंत्री संजय राठोड, विधान परिषद उपसभापती निलम गोऱ्हे उपस्थित होत्या. विरोधकांनी कितीही टीका केली तरी लाडकी बहिण योजना बंद होणार नाही, असा पुनरुच्चार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केला.

<><><><><>

बेंगळुरूमधे चिन्नास्वामी स्टेडीयमजवळ झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी रॉयल चॅलेंजर बेंगळुरूच्या विपणन विभागाचा प्रमुख निखिल सोसाळे याच्यासह आणखी दोघांना अटक केली. त्यात डीएनए एंटरनेटमेंटचा सुनिल मॅथ्यू आणि किरण कुमार यांचा समावेश आहे.

याप्रकरणी कर्नाटक राज्यशासनानं बेंगळुरूचे पोलीस आयुक्त बी. दयानंद आणि इतर अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. तसंच कर्नाटक उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती मायकल डी. कुन्हा यांचा चौकशी आयोग नेमला आहे. आयोग येत्या तीस दिवसात अहवाल सादर करेल.

<><><><><>

भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर आज रवाना झाला. या दौऱ्यात ५ कसोटी सामने होणार असून ते २०२५-२०२७ च्या आयसीसी जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेचा भाग आहेत. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गज क्रिकेटपटूंनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरचा हा भारतीय संघाचा पहिलाच कसोटी दौरा आहे. शुभमन गिल कडे नेतृत्वाची धुरा आहे.

//<><><><><>//